महाबीज

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

मुख्य कार्यालय: महाबीज भवन, कृषि नगर, अकोला–४४४१०४
दूरध्वनी क्र. (०७२४) २४५५०९३ मोबा.७५८८६०७६१२ फॅक्स ०७२४–२४५५१८७
इ–मेल hoadmin@mahabeej.com वेब साईट www.mahabeej.com

## थेट मुलाखती

खरीप २०१८ हंगामाकरीता विविध ठिकाणी उत्पादन व विपणन विषयक कामकाज हाताळण्यासाठी तीन महिने कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी कर्मचा–यांची आवश्यकता आहे. तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करावयाचे कर्मचा–यांचा पदनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अहर्ता | पद संख्या | पारिश्रमिक दरमहा रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | सहायक क्षेत्र अधिकारी | मान्यताप्राप्त कृषि विद्यापीठाची बी.एस.सी. (कृषि/उद्यानविद्या/कृषि व्यवसाय व्यवस्थापन/वनविद्या) पदवी तसेच संगणक हाताळणी बाबतचे मुलभूत ज्ञान आवश्यक | ३१ | १५,००० ते २०,००० |
| २ | कनिष्ठ लिपीक–टंकलेखक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी तसेच शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळ/महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेची इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र. मि.आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण | २२ | १२,००० |

जिल्हा निहाय उमेदवाराची आवश्यता असलेले ठिकाण

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | सहायक क्षेत्र अधिकारी | कनिष्ठ लिपीक | थेट मुलाखतीचे ठिकाण तारीख व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | अकोला | अकोला | ०१ | ०१ | महाबीज भवन, मुख्य कार्यालय कृषि नगर, अकोला दि.२४.५.२०१८ वेळ सकाळी ११.०० वाजता |
| | | अमरावती | ०१ | ०१ | |
| | | बुलडाणा | ०४ | — | |
| | | वाशीम | ०४ | ०१ | |
| | | यवतमाळ | — | ०१ | |
| २ | नागपूर | नागपूर | ०१ | — | |
| | | भंडारा | ०१ | — | |
| ३ | जळगाव | जळगांव | ०२ | — | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या. जिल्हा कार्यालय बाळासाहेब पवार सहकार भवन,मोंढा रोड जाफर गेट, औरंगाबाद दि.१९.५.२०१८ वेळ सकाळी ११.०० वाजता |
| | | धुळे/ नंदुरबार | ०१ | — | |
| | | नाशिक | ०१ | — | |
| ४ | परभणी | परभणी | ०२ | ०३ | |
| | | हिंगोली | ०१ | ०१ | |
| | | नांदेड | — | ०१ | |
| | | लातूर | — | ०१ | |
| | | उस्मानाबाद | ०१ | ०१ | |
| ५ | जालना | अहमदनगर | ०२ | ०३ | |
| | | औरंगाबाद | ०२ | ०१ | |
| | | जालना | ०१ | ०१ | |
| | | बीड | ०२ | ०२ | |
| ६ | पुणे | पुणे | ०२ | ०२ | |
| | | सांगली | — | ०१ | |
| | | कोल्हापूर | ०२ | — | |
| | | ठाणे | ०१ | ०१ | |
| | एकूण | | ३१ | २२ | |

www.vskstudy.com

Scanned by CamScanner

उपरोक्त पदांकरीता अहर्ताप्राप्त उमेदवार (Fresh Candidates) तसेच महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित च्या आस्थापनेवरून संबधीत अथवा त्यापेक्षा वरीष्ठ पदावरून सेवानिवृत्त झालेल्या इच्छुक उमेदवारांनी दिनांक दिनांक १९ मे, २०१८ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता म.रा.बि.म.मर्या.,जिल्हा कार्यालय, बाळासाहेब पवार सहकार भवन, मोंढा रोड, जाफरगेट, औरंगाबाद येथे आणि दिनांक २४ मे, २०१८ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता महामंडळाचे मुख्यकार्यालय, महाबीज भवन, कृषि नगर, अकोला येथे (यापैकी आपले सोयीचे ठिकाणी) थेट मुलाखती करीता आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित राहावे.

**शर्ती व अटी :**

१) थेट मुलाखतीच्या आधारे उमेदवाराची तात्पुरत्या स्वरूपात तीन महिने कालावधीकरीता नियुक्ती करण्यात येईल व सदर तीन महिन्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर त्यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने केलेली नियुक्ती संपुष्टात येईल.

२) तसेच नवीन उमेदवाराची सहायक क्षेत्र अधिकारी या पदावर निवड करताना त्याचे मुलाखतीच्या आधारे गुणवत्तेवरून उमेदवारास पारिश्रमीकाची प्रतिमाह राशी रू.१५,०००/— ते रू.२०,०००/— च्या दरम्यान अनुज्ञेय करण्यात येईल.

३) तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारास महामंडळाच्या आस्थापनेवरील कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क राहणार नाहीत.

४) तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात आलेला सेवानिवृत्त कर्मचारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच संबधीत विषयक बाबींचे कामकाज हातळण्याची त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

५) नियुक्तीच्या तीन महिन्याच्या कालावधीत विविध विषयक काम पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.

६) उपरोक्त तात्पुरत्या नियुक्तीकरीता महामंडळाचा सेवानिवृत्त कर्मचारी असल्यास संबधीत अधिकारी/कर्मचा—याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावीत नसावी.

७) नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या तात्पुरत्या स्वरूपातील सेवा केव्हाही समाप्त करण्याचे अधिकार राहतील. तसेच संबधीत पदावर सरळसेवेव्दारे नियमीत कर्मचा—याची नियुक्ती करण्यात आल्यास संबधीत तात्पुरत्या स्वरूपातील कर्मचा—याच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

८) संबधीत उमेदवार त्याच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

९) संबधीत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा—यास महामंडळाच्या कामकाजानिमित्त दौरा करावा लागल्यास त्यांना महामंडळामधील त्या पदाचा लागू असलेला प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

१०) संबधीत तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा—यास त्यांना प्राप्त होणा—या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

११) नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूल्यमापन करतील.

इच्छुक पात्र उमेदवारांनी मुलाखती करीता नमुद करण्यात आलेल्या तारखेस,वेळेत व ठिकाणी आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रासह व एक स्वस्वाक्षरांकीत झेरॉक्स प्रतीसह मुलाखतीकरीता उपस्थित राहावे.

जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा किवा जाहिरात पूर्णपणे रद्द करण्याचा अधिकार महामंडळाने राखुन ठेवलेला आहे.

ठिकाण :— अकोला
दिनांक :— ११.०५.२०१८

व्यवस्थापकीय संचालक

www.vskstudy.com

Scanned by CamScanner